# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 388/2022 दिनांक : 08.10.2022**

## 1)घरफोडी :–

**उस्माननगर :–** दिनांक 06.10.2022 रोजी रात्री 09.00 ते दि. 07.10.2022 चे पहाटे 03.30 वा. चे दरम्यान, **मौ. आलेगाव फिर्यादीचे दुकानात ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हा किराणा दुकानाचे शटरचे कुलूप लावुन घरी गेला असता यातील नमुद आरोपीने फिर्यादीचे किराणा दुकानाचे शटरचे कुलूप तोडुन आत प्रवेश करून टेबलचे ड्रॉप मध्ये गल्यात ठेवलेले नगदी 5000/–रूपये चोरून नेले. वगैरे **फिर्यादी साईनाथ आनंदराव वरताळे, वय 26 वर्षे, व्यवसाय व्यापार रा. आलेगाव ता. कंधार जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे उस्माननगर** गुरन 170/2022 कलम 457, 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/706 पवार, मो.क्रं. 9373545955** हे करीत आहेत.

## 2)कलम 380 चोरी :–

**भाग्यनगर :–**दिनांक 07.10.2022 रोजी चे 02.30 वा. चे सुमारास, **पाटनुरकर नगर नांदेड येथे,** यातील फिर्यादी ही रात्री 02.30 वा. बाथरूमला गेली असता अंधाराचा फायदा घेवुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने घरात प्रवेश करून दोन मोबाईल व एक मनगटी घडयाळ व रोख रक्कम 2000/–रूपये असा एकुण 26,000/–रूपयाचा मुद्येमाल चोरून नेला आहे. वगैरे **फिर्यादी मधुरा भ्र. उल्हास सत्केपार, वय 52 वर्षे, व्यवसाय घरकाम रा. हिंगोली ता. जि. हिंगोली ह. मु. पाटनुरकरनगर नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 353/2022 कलम 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/614 सातारे, मो.क्र. 9823170905** हे करीत आहेत.

## 3)मो. सा. चोरी :–

**1)नांदेड ग्रामीण :–** दिनांक 03.10.2022 रोजी 03.00 ते 06.00 वा. चे दरम्यान, **यशोसाई हॉस्पीटलच्या गेटसमोर नांदेड येथे,** यातील फिर्यादी त्यांची हिरो होंडा स्पलेंडर प्रो कंपणीची मो सा क्रं एमएच–26/एक्यु–5622 किंमती 25,000/–रूपयाची येशोसाई हॉस्पीटलचे गेट समोर लावुन पाहुण्याना भेटण्यासाठी गेला असता नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी आबाजी बापुराव जामगे, वय 33 वर्षे, व्यवसाय शेती रा. जामगा ता. लोहा जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरन 609/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1224 सुर्यवंशी, मो.क्रं. 8329712505** हे करीत आहेत.

**2)शिवाजीनगर :–** दिनांक 05.10.2022 रोजी 19.00 ते दि. 06.10.2022 चे 06.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे राहाते घरा समोरून दत्तनगर नांदेड येथे,** यातील फिर्यादीची पॅशन प्रो. हिरो होंडा कंपणीची मो सा क्रं एमएच–26/एक्स–6147 किंमती 30,000/–रूपयाची घरा समोर लावली असता कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी प्रभाकर सत्तया रॉपाका, वय 39 वर्षे, व्यवसाय प्रिंटींग प्रेस रा. दत्तनगर नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरन 368/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री शिंदे, मो.क्रं. 9075479885** हे करीत आहेत.

**3)वजिराबाद :–** दिनांक 02.10.2022 रोजी 16.15 ते 16.25 वा. चे दरम्यान, **जनप्रिया हॉटेल समोर वजिराबाद नांदेड येथे,** यातील फिर्यादीची पॅशन प्रो. कंपणीची मो सा क्रं एमएच–26/एएच–6348 किंमती 25,000/–रूपयाची जनप्रिया हॉटेल समोर उभी करून हार घेण्यासाठी बाजारात गेले असता नमुद ठिकाणावरून कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी दिलीप परसुराम जाधव, वय 40 वर्षे, व्यवसाय हॉटेल कामकाज रा. जयभिमनगर नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरन 351/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/2267 , मो.क्रं. 7498883410** हे करीत आहेत.

## 4)आत्महत्येस प्रवृत्त केले :—

**नांदेड ग्रामीण :—**दिनांक 07.10.2022 रोजी 10.30 वा. चे सुमारास, **घरातील छताच्या पंख्याला क्रांतीचौक सिडको नांदेड येथे,** यातील फिर्यादीचा मुलगा **मयत नामे दत्तराम रामराव मोरे, वय 27 वर्षे, रा. क्रांती चौक सिडको नांदेड** यांचे मागील तीन वर्षा पुर्वी प्रेमसंबधातुन लग्न झाले होते. यातील आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीस तुझ्या मुलासोबत राहायचे नाही फारकत घ्यायची आहे. त्यासाठी दहा लाख रूपये दे असे म्हणाली व फिर्यादीचे मयत मुलास त्रास दिल्याने त्याने पेनने स्वतःचे मांडीवर माझ्या मरणास यातील नमुद आरोपी हे कारणभुत आहेत. त्यांनी मला खुप त्रास दिला आहे असे बॉलपेनने लिहुन घरातील छताच्या पंख्याला गळफास घेवुन आत्महत्येस प्रवृत केले. वगैरे **फिर्यादी श्रीमती गोदावरी रामराव मोरे, वय 50 वर्षे, व्यवसाय घरकाम रा. दापशेड ता. लोहा जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरन 610/2022 कलम 306, 34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री पाटील, मो.नं. 9421839066** हे करीत आहेत.

## 5)अपघात :—

**उस्माननगर :—** दिनांक 20.10.2022 रोजी 10.30 वा. चे सुमारास, **दहीकळंबा ते नांदेड रोडवर नामदेव नारायण शिंदे यांचे दहीकळंबा गावाजवळील शेतातील आखाडयावर ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे संभाजी जळबा शिंदे, वय 60 वर्षे, रा. दहीकळंबा ता. कंधार जि. नांदेड** हा घरून शेताकडे पायी चालत जात असतांना यातील अज्ञात मो सा स्वाराने त्याचे ताब्यातील वाहन मो सा हयगयीने व निष्काळजीपणे भरधाव वेगात चालवुन यातील मयतास समोरून जोराची धडक देवुन मयताचे डोक्यात आतुन गंभीर मार लागुन त्यांचे कानातुन नाकातुन रक्तस्त्राव येत असलेने त्यास उपचार कामी सरकारी दवाखाना विष्णुपूरी नांदेड येथे शरीक केले असता उपचारा दरम्यान दिनांक 21.09.2022 रोजी सकाळी 09.45 वा. मरण पावला. यातील अज्ञात आरोपी हा यातील मयताचे मरणास कारणीभुत झाला. वगैरे **फिर्यादी बळवंत माधवराव शिंदे, वय 37 वर्षे, व्यवसाय शेती रा. दही कळंबा ता. कंधार जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे उस्मानगर** गुरनं. 171/2022 कलम 279, 337, 338, 304(अ), भादवि सह कलम 134/177 मोवाका कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री पल्लेवाड, मो.क्र. 7350756405** हे करीत आहेत.

## 6)भारतीय हत्यार कायदा :—

**हिमायतनगर :—** दिनांक 07.10.2022 रोजी 00.30 वा. चे सुमारास, **कनकेश्वर विसर्जनाचे ठिकाणी हिमायतनगर नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या आपले ताब्यात लोखंडी तलवार बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/1903 सखाराम सुराजी पवार, ने. पोस्टे हिमायतनगर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हिमायतनगर** गुरनं 227/2022 कलम 4/25 शस्त्र अधिनियम 1959 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2303 सिंगनवाड, मो.क्र. 9049078521** हे करीत आहेत.

## 7)जुगार :—

**1)मुक्रामाबाद :—** दिनांक 07.10.2022 रोजी 16.15 वा. चे सुमारास, **बाऱ्हाळी रोडवर ता. मुखेड जि. नांदेड येथे,** यातील नमुद चार आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या तीर्रट नावाचा जुगार खेळत व खेळवित असतांना 8690/—रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी सपोनि/संग्राम उध्दवराव जाधव, ने. पोस्टे मक्रामाबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुक्रामाबाद** गुरनं 233/2022 कलम 4, 5 म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2319 सिध्देश्वर, मो.क्र. 7620481485** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड